6/2016
ISSN NO 2455-859X Peer reviewed March (or) 2016
Pune Research world International Interdisciplinary Studies Vol-I
Impact factor 2.54 (IIJIF)

# गोंधळ — एक विधिनाट्य : संकल्पना आणि स्वरूप

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलडाणा, महाराष्ट्र भारत

**प्रस्तावना :**

विधिनाट्य हा विधीशी निगडीत नाट्याविष्कार असून, घरी एखादे मंगलकार्य झाल्यानंतर कुलाचाराच्या स्वरूपात तो पार पाडण्यात येतो. संबंधित देवतेच्या भक्तांस निमंत्रित करून विधिनाट्य पार पाडले जाते. कुलाचार केल्याने अपेक्षित फलप्राप्ती होते आणि न केल्याने देवतांचा प्रकोप होतो अशी लोकसमजुत असल्याने [illegible]

विधिनाट्य सादर करताना संबंधित देवतेची रंगभूमीवर प्रतिष्ठापना करून विधिनाट्याची रंगभूमी अभिमंत्रित केली जाते. देवतांना आवाहन केल्यानंतर देवता उपस्थितीचा मानसअनुभव घेत देवतेचे नमन, लीलागायन करून प्रेक्षकांना, श्रोत्यांना साक्षात अनुभव देणे हे विधिनाट्याचे स्वरूप असते. देवतांची उपस्थिती गृहीत धरल्यामुळे देवतेची आरती होऊन आणि यजमानाच्या शिरावरील भार उतरून या विधिनाट्याची सांगता होते. घटस्थापना–गण–गौळण–देवतांना आवाहन–नमन–संकीर्तन किंवा लीलागायन दर्शन–आरती–भार उतरवणे हा विधिनाट्याचा आकृतीबंध असतो. गोंधळ, जागरण आणि भराड या तिन्हीही प्रकारच्या विधिनाट्याचा आकृतीबंध हाच असतो.

महाराष्ट्रामध्ये गोंधळ या विधिनाट्याला लोकधर्मात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गोंधळी लोक देवीच्या उपासनेच्या स्वरूपाचा कुलाचार पार पाडतात, त्यालाच गोंधळ असे म्हणतात. गोंधळी जातीचे लोक महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या प्रांतात विशेषकरून आढळतात. गोंधळ्यांनी या विधिनाट्याला एक संस्थात्मक स्वरूप प्राप्त करून दिले आहे. गोंधळ हा आता केवळ विधी राहिला नसून विधिस्वरुपाचा एक नाट्यप्रकार झाला आहे. हा नाट्यप्रकार विकसित करण्याचे आणि त्या माध्यमातून महाराष्ट्रात देवीसंबंधीची श्रध्दा जागृत ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य गोंधळ्यांनी केले आहे.

**गोंधळांचे प्रकार :**

गोंधळाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार असतात. गोंधळ्यांच्या उत्तम वृंदात बत्तीसजण असतात, तर मध्यम वृंदात सोळा आणि कनिष्ठ वृंदात आठ माणसे असतात. महाराष्ट्रात आज जे गोंधळ प्रचलित आहेत त्यातील गोंधळ्यांची संख्या चार ते आठ अशी असते. संबळवादक एक किंवा दोन आणि तुणतुणे वाजविणारे दोन असे सहकारी असतात. हे सगळेच समूहगायनात साथ देत असतात. आज रूढ असलेल्या गोंधळाच्या प्रकारात काकड्या गोंधळ व संबळ्या गोंधळ असे दोन प्रकार आढळतात. काकड्या गोंधळ हे कोणत्याही जातीचे लोक करू शकतात. हातात काकडा घेऊन देवीची गाणी म्हणून आणि शेवटी भंदे खेळून काकडा गोंधळ होतो. भंदे हे मातीच्या मडक्याच्या अर्ध्या भागात सरकी टाकून तयार केले जाते. त्यात सरकीचे तेल सोडून सरकी पेटविली जाते. पेटलेले भंदे देवीभोवती ओवाळण्याच्या क्रियेला 'भंदे खेळणी' असे म्हणतात. परंपरेने चालत आलेल्या आणि लोकजीवनामध्ये प्रचलित असलेल्या देवीच्या वैशिष्ट्यपूर्ण आरतीचा हा प्रकार दिसतो.

330



Scanned with CamScanner

संबळया गोंधळ हा गोंधळी जातीचे लोकच घालतात. संबळ या वाद्याच्या साथीने गोंधळाचे हे विधिनाट्य सादर केले जाते. म्हणून त्याला संबळया गोंधळ असे म्हणतात. संबळया गोंधळाचे सध्या घडीचे गोंधळ आणि आख्यानी गोंधळ असेही प्रकार पडतात. संबळ हे वाद्य म्हणजे नगारा प्रकारच्या दोन वाद्यांची जोडी असते. गोंधळी देवीच्या भक्तीपर गायनात या वाद्यांचा उपयोग करतात.

**गोंधळ या विधिनाट्याचे मूळ :**

महाराष्ट्रात देवीच्या उपासनेत रूढ असलेल्या गोंधळ या विधिनाट्याचे मूळ कशात आहे, यासंदर्भात निश्चितरीत्या सांगणे कठीण असले तरी देवतेची स्तुती करण्याचा हा विधी फार प्राचीन काळापासून रूढ असावा, असे निश्चितपणे म्हणता येते. गोंधळ हा शब्द गडबड या अर्थी वापरला जातो. त्यावरूनच गोंधळ म्हणजे गडबड, हलकल्लोळ असणे असे अर्थ रूढ झाला आहे. गोंधळ या शब्दाची व्युत्पत्ती सांगण्याचे काही प्रयत्न झाले आहेत. लोकनाट्याची परंपरा या ग्रंथात श्री. वि. कृ. जोशी यांनी 'गणदल' या शब्दापासून गोंधळ या शब्दाची व्युत्पत्ती दाखविली आहे. त्यांच्या मते गोंधळाचे गणदलाशी साम्य आहे. एवढेच नाही तर ओरिसा येथे खचिंग या गावी जी भैरवमूर्ती उपलब्ध झालेली आहे, त्यात दोन भक्तही दाखविले आहेत. त्यांचे गोंधळ्याशी साम्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ग. ह. खरे यांच्या मूर्तीविज्ञान या ग्रंथात भैरवमूर्ती व त्याच्या शेजारी असलेले दोन भक्त यांचे वर्णन आलेले आहे. वि. कृ. जोशी यांनी त्यातील साम्याचा आधार घेऊन गणदल यांपासून गोंधळ शब्द निर्माण झाला असावा, या आपल्या तर्काला मूर्तीमुळे पुष्टी मिळत असल्याचे म्हटले आहे. गोंधळी हे शंकराचे अकरा रुद्रगण. शंकराने मनकर्णिका नदीवर जेव्हा तपश्चर्या केली, त्यावेळी त्यांनी रुद्रगणांना शस्त्रे आणि आभूषणे दिली. या आभूषणांनी विभूषित हे गण म्हणजेच शंकराचे भक्त होत. गण याचा अर्थ असाच होतो. या भक्तगणांनी म्हणजेच गणदलांनी रूढ केलेला भक्तीचा प्रकार म्हणून या नाट्यमय विधीस गोंधळ म्हणत असावेत, असा तर्क जोशी यांनी मांडला आहे.

**भूतमातृमहोत्सव व गोंडली नृत्य :**

प्राचीन काळी होणाऱ्या भूतमातृमहोत्सवात होणाऱ्या गोंडली नृत्यात गोंधळ या विधीनाट्याचा उगम असावा. गोंधळ या विधिनाट्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करीत असताना डॉ. रा. चिं. ढेरे यांना काळाच्या ओघात विस्मृतीत दडलेले एक श्रद्धाकेंद्र आढळले . इ. स. 1240 मध्ये वरंगळचा राजा गणपती काकतीय याच्या एका अधिकाऱ्याने 'नृत्यरत्नावली' नावाचा जो ग्रंथ रचला त्यात दिलेली माहिती महत्वपूर्ण आहे. 'कल्याणीचा राजा सोमेश्वर (तृतीय) याने आपल्या कल्याणी नामक राजधानीत भूतमातृमहोत्सवाच्या निमित्ताने गोंडली नृत्य करविले होते. महाराष्ट्रात गोंडली या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या नृत्यात काही सुधारणा करून सोमेश्वराने त्यास चित्रगोंडळी असे नाव दिले. डॉ. ढेरे यांच्या मते काकतीय राजाचा अधिकारी जायन याने लिहिलेल्या नृत्यरत्नावलीत ज्या गोंडली नृत्याचा उल्लेख केला आहे, तेच आजच्या गोंधळ नृत्याचे प्राचीन स्वरूप असावे. सारंगदेवाच्या संगीत रत्नाकर या ग्रंथात गोंडली विधीचे वर्णन आहे. त्याचेही स्वरूप गोंडली नृत्यवर्तनासारखेच आहे. सारंगदेव या यादवांच्या काळातील संगीततज्ञाने अनेक आधार देऊन देशी नृत्याची चर्चा त्याच्या ग्रंथात केली आहे. त्यात गोंडली नृत्याचे वर्णन आलेले आहे. गोंडली नृत्याचा जन्म कर्नाटकात झाला असल्याचे सारंगदेवाने साधार स्पष्ट केले आहे. भूतमातृमहोत्सवाचे उल्लेख आणि भूतमातृमहोत्सवात गोंडली नृत्य करविल्याचा उल्लेख आहे. भूतमातेचे ठाणे कर्नाटक, महाराष्ट्रातून गेले असावे. महाराष्ट्रात सध्या भूतमातेची उपासना अस्तित्वात नसली तरी या उत्सवातील भूतनृत्य कल्याणी नगरीत भूतमातृमहोत्सवात झालेले गोंडली नृत्य असावे.

महाराष्ट्रातील गोंधळ्यांनी या विधिनाट्याच्या स्वरूपाला विकसित करून त्याचा एक निश्चित असा आकृ तीबंध सिध्द केला आहे.

**गोंधळ विधिनाट्याचे स्वरूप –**

गोंधळ या विधिनाट्यात आधी देवतेचे अधिष्ठान निर्माण केले जाते. त्यासाठी भूमीवर एका बाजूला घटस्थापना करतात. उसाची किंवा ज्वारीची पाच ताटे अशा रीतीने बांधतात की ज्यांचे वरचे भाग एका जुडीसारखे आणि खाली पाच टोके पसरून एक चौकोन तयार व्हावा. उसाच्या तिकाटणीत तांबडे मदन्याचे कापड अंथरून त्यावर धान्याने गादी भरतात. मध्ये लहानशी धान्याची रास मांडून त्यावर पाण्याने भरलेला तांब्या आणि त्यात नागवेलीची पाने ठेवून त्यावर नारळ ठेवतात. धान्याच्या गादीवर घट ठेवतात. घटस्थापना केल्यानंतर समोर देवीचा टाक मांडतात. समोर पाच विड्याची पाने मांडून त्यावर खारीक, खोबरे, सुपारी व पैसा ठेवून धूप, दीप, उदबत्ती लावतात व यजमानाकडून देवीच्या घटाची व टाकाची यथासांग पूजा करण्यात येते. देवतेची प्रतिष्ठापना झाल्यानंतर गोंधळाचे वाद्य संबळ, तुणतुण्याच्या साथीने आसमंत नादमय केला जातो. समोर असलेल्या प्रेक्षकांची जाणीव ठेवून विधिनाट्याच्या सादरीकरणाला प्रारंभ होतो. प्रथम गण गायला जातो. रंगभूमीची देवता गणपती, त्याच्याच आशीर्वादाने रंगभूमीवरील रंगाविष्कार सिद्ध होतो. प्रथम गणेशाला आवाहन आणि वंदन केले जाते. गणेशाच्या आवाहनाच्या पदांनाच गण असे म्हणतात. गण गायिल्यानंतर श्रीकृष्णाची लीला गायिली जाते. त्याला 'गवळण' असे म्हणतात. गवळण फक्त गायिली जात नाही तर त्यातील नाट्य साकार केले जाते. म्हणून गवळणगायन हे गीत, नृत्य, नाट्य, आणि संवाद या कलाविष्काराने युक्त असते. गवळणीचे हे नृत्यनाट्य सादर झाल्यानंतर निरनिराळ्या देवतांना आवाहन केले जाते.

**गोंधळातील वाद्ये :**

संबळ आणि तुणतुणे ही गोंधळाची प्रमुख वाद्ये असतात. संबळाची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. कपाच्या आकाराची दोन भांडी, वेत किंवा दोरीच्या सहाय्याने कातडी मढवलेली अशी संबळाची रचना असते. त्याला जोडसमेळ असेही म्हणतात. समेळात नर आणि मादी अशा दोन निराळ्या खोडांपैकी नरसमेळ डग्याचे बोल आणि मादीसमेळ तबल्याचे बोल पुरवितो. समेळांना वेताच्या काठ्यांनी वाजवितात. गोंधळाचे दुसरे वाद्य तुणतुणे हे असते. सर्वच लोकनाट्य प्रकारात तुणतुणे वापरले जाते. तुणतुणे डाव्या हातात धरून उजव्या हातातील एका लाकडाच्या तुकड्याने वाजविले जाते. 'चौंडक' असेही तुणतुण्याला म्हटले जाते. अलीकडच्या काळात संबळ, तुणतुण्याबरोबर गोंधळी इतर वाद्यांचाही अवलंब करू लागले आहेत.

**गोंधळाचा पूर्वरंग आणि उत्तररंग :**

गोंधळाच्या विधिनाट्यात देवप्रतिष्ठापना आणि पूजा, गण, गवळण आवाहन त्याचबरोबर नमन येथपर्यंतचा एक भाग आणि पुढे आख्यान, गायन आणि सादरीकरण, आरती व भार उतरविणे हा दुसरा भाग अशा दोन भागांत वर्गीकरण करता येते. पहिल्या भागाला पूर्वरंग तर दुसऱ्या भागाला उत्तररंग म्हणता येईल. उत्तररंगात संगीत, नृत्य, नाट्य यांचा संयोग असतो. यात पौराणिक किंवा लौकिक आख्याने असतात. उत्तररंग हा नाट्यपूर्ण असतो. त्यामुळे या एकूण विधीला विधीनाट्य असे म्हटले जाते. लीलागायन आणि लीलादर्शन हे त्याचे मुख्यत्वे स्वरूप असते. पूर्वरंग आणि उत्तररंग मिळून गोंधळाचे विधिनाट्य साकार होते.

330

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार

2/2

**गोंधळाची गाणी :**

गोंधळी पौराणिक आख्याने म्हणतात. ही पौराणिक आख्याने रामायण, महाभारत, पुराणे यांच्या आधाराने आम्ही गातो असे ते सांगतात. परंतु काही कथांना मुळात कोठेच आधार नसतो. जांभूळ आख्यान, घटोत्कचवध, अभिमन्यूवध अशा अनेक कथा दाखविता येतील ज्यांना महाभारतात काहीही आधार नाही. लोकपरंपरेत चालत आलेल्या कथा, कल्पना गोंधळी आपल्या कथागीतांच्या रूपाने गातात. गोंधळी मुळात कोणत्याच ग्रंथाचा आधार नसलेल्या, लोकपरंपरेत प्रचलित असलेल्या कथा गातात आणि नाट्यरूपाने सादर करतात.

**गोंधळाच्या आख्यानाचे स्वरूप :**

गोंधळी पौराणिक तसेच लौकिक विषयावर परंपरेने चालत आलेली किंवा स्वरचित आख्याने गातात आणि नाट्यरूपाने सादर करतात. पौराणिक अंतर्भूत असे लौकिक असेच या आख्यानाचे स्वरूप असते. भक्तीचा प्रसार, सामाजिक नीतीचा प्रसार ही प्रयोजनेही गोंधळ्यांच्या पौराणिक आशयावरील गीतांमागे असतात. गोंधळ्यांच्या आख्यानामध्ये मूळ कथानकाबरोबर अनेक उपकथानके असतात. ही उपकथानके मूळ कथानकाशी संबंधित असावीतच असे नाही. त्यांच्या आख्यानाचे कथन साभिनय आणि आरोह अवरोहयुक्त असते. कथानकाचा प्रसंगानुसार आणि परिस्थितीनुसार संक्षेपविस्तार केला जातो. गोंधळ्यांचे नृत्य गोल फिरणे, स्वतःभोवती गिरक्या घेणे आणि गिरक्या घेताना हातांच्या बोटांच्या मुद्रा करणे या स्वरूपाचे असते. गोंधळ्यांच्या गायकीमध्ये एकट्याने, साथीद्वाराने आणि सामुहिक रीतीने अशा तिन्ही प्रकारांच्या गायनाचा समावेश असतो. आख्यानाच्या सादरीकरणात नृत्य, कथन, गायन, संवाद या सर्व आविष्कारमाध्यमांचा सुरेख मेळ असतो.

गेल्या काही वर्षांपासून भारतीय समाजाला आपल्या संपन्न सांस्कृतिक वारशाचे भान आले आहे. शासनही परंपरेने चालत आलेल्या कलाविष्कारकडे जाणिवेने पाहू लागले आहे. गोंधळ्यांच्या रंगाविष्काराकडे केवळ शासनाचीच नाही तर नाट्यक्षेत्रातील रंगकर्मींचीही दृष्टी वळली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून गोंधळ या विधीनाट्याविषयी एकूण समाजात निराळे कुतूहल निर्माण झाले आहे. गोंधळातील कलात्मकतेकडे डोळसपणे पाहण्यात येऊ लागले आहे. आज पारंपारिक विधिनाट्यस्वरूपी कलाविष्काराला अभिजनांची मान्यता मिळाली आहे. तसेच हे पारंपरिक कलावंत अभिजनांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या सादरीकरणातही लक्षणीय बदल होऊ लागले आहेत. एक नाट्यप्रकार म्हणून रंगभूमीवर गोंधळ सादर होऊ लागले. गोंधळ हा देवीच्या भक्तीच्या प्रेरणेनेच न घडता आज कलाविष्काराच्या प्रेरणेनेही सादर करण्यात येऊ लागला आहे.

## संदर्भ ग्रंथ :


१) डॉ. प्रभाकर मांडे – लोकरंगभूमी (परंपरा, स्वरूप आणि भवितव्य)
२) डॉ. रा. चिं. ढेरे – लोकसंस्कृतीचे उपासक


Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

330

प्रा. डॉ. सविता माधवराव-पवार 213